# समिति दर्पण

मे २०२४

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www. samiti.org



### समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी सहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉक्टर अच्युतराव आपटे, स्वातंत्र्यसेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात पाच वसतिगृहे आहेत. त्यात ७५० विद्यार्थी-विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा त्रिसूत्री वर समितीचे काम चालते.

# स्वप्न साकारले, स्वतःला सिद्ध केले...

**पुण्यात उच्च शिक्षण घेण्यासाठी आलेल्या ग्रामीण भागातील गरीब, गरजू विद्यार्थ्यांना विद्यार्थी साहाय्यक समितीत प्रवेश दिला जातो. समितीतील शिस्त, विविध उपक्रम यामुळे एक- दोन वर्षांतच या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात आमूलाग्र बदल होतो. त्यांचा आत्मविश्वास वाढतो. स्वतःला सिद्ध करण्याची संधी त्यांना मिळते. पदवी घेतल्यानंतर समितीतून बाहेर पडताना त्यांच्या मनातील भावना त्यांच्याच शब्दांत...**

## आयुष्यातील टर्निंग पॉईंट



समितीमधील प्रवेश हा माझ्या आयुष्यातील सर्वांत मोठा टर्निंग पॉईंट ठरला. समितीचे नियम, शिस्त, विद्यार्थी विकास केंद्राचे उपक्रम, कमवा- शिका योजना यांचा मला खूप फायदा झाला. माझी तेजस्विनी प्रोजेक्ट अंतर्गत भारत फोर्ज स्कॉलरशिप प्लस मेंटॉरशिप प्रोग्रॅमसाठी निवड झाली. स्कॉलरशिपमुळे माझे शिक्षण पूर्ण होऊ शकले, करिअरसाठी मार्गदर्शन मिळाले. कमवा- शिका प्रमुख असताना अनेक लोकांशी संपर्क आला. या योजनेतून समितीतला प्रत्येक विद्यार्थी स्वावलंबी जीवन जगतोय. संस्कारांची श्रीमंती समितीने दिली. कार्यकर्त्यांकडून माणुसकीचे धडे मिळाले.

**- कल्याणी लहाने,**
फुलब्री, जि. छत्रपती संभाजीनगर.

## समितीचा भाग झाल्याचा अभिमान



समितीचा भाग होणे, ही माझ्यासाठी खूपच अभिमानाची गोष्ट होती. समितीतील विविध उपक्रमांमुळे माझे ज्ञान आणि अनुभव वृद्धिंगत झाले. योग्य दिशा मिळाली. समिती वास्तव्यात केवळ शैक्षणिकच नव्हे, तर वैयक्तिक आयुष्यातील अनेक महत्त्वाचे धडे शिकलो.

**- सौरभ कोकरे,**
पवईमाळ, ता. बारामती, जि.पुणे

## शिक्षणाचे स्वप्न पूर्ण झाले



बारावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर मराठवाडा मित्र मंडळ संस्थेमध्ये B.Sc. (Computer Science) साठी मला प्रवेश मिळाला. परंतु पुण्यात शिक्षणासाठी लागणारा खर्च माझ्या कुटुंबाला झेपणारा नव्हता. अशातच विद्यार्थी साहाय्यक समितीने मायेची सावली दिली. शिक्षणातील आर्थिक अडचणी समितीने दूर केल्या. योगासने, चार तास काम, कमवा- शिका योजना, पाल्य- पालक योजना तसेच विद्यार्थी विकास केंद्र याचा मला खूप फायदा झाला आहे. समितीने केलेल्या मार्गदर्शनामुळेच माझी CONTUS TECH या कंपनीमध्ये प्लेसमेंट झाली. समितीमुळेच माझे शिक्षण घेण्याचे स्वप्न पूर्ण झाले.

**- प्रविण गजानन इंगोले,**
जवळा बुद्रुक, जि. हिंगोली

## स्वतंत्र बेड, टेबल पाहून आनंद



समितीमध्ये प्रवेश मिळाल्यानंतर रुममध्ये जाताच स्वतंत्र बेड, टेबल, कपाट हे सारे पाहून खूप आनंद झाला. समितीत सुरुवातीला कार्यक्रम म्हटले की कधी कधी कंटाळा यायचा. पण कार्यक्रमाला गेले की वाटायचे बरे झाले आलो, खूप काही शिकायला मिळायचे. सुरुवातीला घरची खूप आठवण यायची, पण नंतर समितीच माझे घर झाले.

**- निकिता वाघमारे,**
माथेरान, जि. रायगड

## जीवनाला दिशा मिळाली



बारावीनंतर पुण्यातील मॉडर्न इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला. पण शिक्षणाचा खर्च माझ्या कुटुंबाला झेपणारा नव्हता. विद्यार्थी साहाय्यक समितीमध्ये प्रवेश मिळाला आणि खऱ्या अर्थाने जीवनाला वेगळी दिशा मिळाली. योगासने, चार तास काम, कमवा- शिका, पाल्य- पालक योजना यामुळे माझ्यात खूप बदल झाला. समितीने वेळोवेळी चांगले संस्कार व शिकवण दिली. आत्मविश्वास दिवसेंदिवस वाढत गेला. आज समितीचा निरोप घेत असलो तरी समितीशी असणारे नाते कधीच तुटू शकणार नाही.

**- ओंकार संतोष दरेकर,**
हिरडगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर

## व्यवस्थापनाच्या कामाची संधी



समितीच्या कडक शिस्तीत राहून मी आनंदाने इंजिनिअरिंगचे शिक्षण पूर्ण केले. येथे मला व्यवस्थापनाची संधी मिळाली. मुलींची उपस्थिती, योगा प्रमुख, इंजिनिअरिंग क्लब हेड अशी वेगवेगळी कामे करण्याची संधी मिळाली, त्यातून आत्मविश्वास वाढला. त्याचा फायदा प्लेसमेंटसाठी झाला. पुण्यात येण्यासाठी घर सोडताना जी भावना मनात होती, तीच भावना आता समिती सोडताना मनात आहे.

**- ऋतुजा सुडके,**
भिलवडी, जि. सांगली

## नामांकित व्यक्तींचा सहवास



समितीत प्रवेश घेतला आणि तीन महिन्यांतच समितीत रुळले. कमवा- शिका योजनेतून स्वतःला सिद्ध करू शकले. वसतिगृह व्यवस्थापनाचा हिस्सा बनले. विविध स्पर्धांमध्ये भाग घेऊन पारितोषिके मिळविली. पाल्य- पालक योजनेतून पुण्यातील नामांकित व्यक्तींचा सहवास लाभला. संकट काळात पर्यवेक्षिकांनी मोलाचे मार्गदर्शन केले. त्यामुळे समितीची मी कायम ऋणी राहिन.

**- पल्लवी मोतीपल्ले,**
पानगाव, जि. लातूर

## लोकांचे प्रश्न अनुभवता आले



पदवी अभ्यासक्रमासाठी फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश मिळाला, पण राहण्याचा प्रश्न होता. समितीत प्रवेश मिळाला. येथे विकसित झालेल्या गुणांतील महत्त्वाचे गुण म्हणजे सेवावृत्ती, स्वच्छता. समितीमुळे माझा अनेक मोठमोठ्या लोकांशी संबंध आला. सामाजिक जाणीव प्रकल्पाची प्रमुख म्हणून पाहिलेले काम, कार्यक्रमांचे आयोजन, अनेक संस्थांना भेटी यातून लोकांचे प्रश्न आणि त्यावरील उपाय जवळून अनुभवता आले.

**- आर्या देशमुख,**
आष्टी, जि. बीड

## वास्तूबरोबर ऋणानुबंध



विद्यार्थी साहाय्यक समितीला निरोप देताना, आयुष्यातील सुवर्णकाळ संपत असल्याची भावना आहे. या वास्तूतील प्रत्येक गोष्टीबरोबर आठवणी तयार झाल्या आहेत. ऋणानुबंध निर्माण झाले आहेत. सन २०२१ मध्ये समितीमध्ये आलेला मी आणि आता २०२४ मध्ये समितीला निरोप देताना मी यामध्ये नक्कीच जमीन- अस्मानाचा फरक आहे. समितीने दिलेल्या संस्काराच्या बळावर मी पुढील आयुष्यामध्ये मोठी झेप घेईन, हा विश्वास आहे.

**- अभिषेक आटोळे,**
बारामती, जि. पुणे

## समिती म्हणजे दुसरे घरच



समितीत आले, तेव्हा पहिल्या दिवशी वाटले की, मी येथे नाही राहू शकत. पण हळूहळू येथे रमले. समितीच माझे दुसरे घर झाले. दोन वर्षांत खूप चांगले अनुभव मिळाले. विद्यार्थी विकास केंद्राच्या उपक्रमांतून ज्ञान मिळाले. आत्मविश्वास वाढला. समितीत जेवण पौष्टिक मिळते. रोज सकाळी दूध, उन्हाळ्यात ताक, फळे, गोड पदार्थ सर्व काही घरच्या सारखे मिळते. रोजच्या योगामुळे माझी पायदुखी थांबली. समितीतून बाहेर पडून जेव्हा मी कमवू लागेन, तेव्हा नक्की समितीला मदत करेन.

**- दिव्या भुकन,**
निघोज, जि. अहमदनगर

# नूतनीकरणामुळे वाढली विद्यार्थी वाचक संख्या

## तिन्ही ग्रंथालयांत मिळून क्रमिकसह विविध विषयांवरील ६ हजार पुस्तकांचा खजिना


विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजविण्याचा प्रयत्न समितीमध्ये आवर्जून केला जातो. समितीच्या डॉ. आपटे वसतिगृह, सुमित्रा सदन, लजपत संकुल या तिन्ही ठिकाणच्या ग्रंथालयांमध्ये क्रमिक पुस्तकांबरोबरच अवांतर वाचनाच्या पुस्तकांचा मोठा खजिना आहे. लजपत संकुलातील ग्रंथालयात एकूण २५०१ पुस्तके असून त्यापैकी ९९९ पुस्तके अवांतर वाचनाची आहेत. यात इंग्लिश पुस्तकांचाही समावेश आहे. सुमित्रा सदनमध्ये एकूण १२६४ पुस्तके असून त्यापैकी मराठी अवांतर वाचनाची ५०२, तर इंग्लिश अवांतर वाचनाची ४४ पुस्तके आहेत. डॉ. आपटे वसतिगृहात एकूण २२३२ पुस्तके आहेत. त्यात ८०० क्रमिक पुस्तके असून मराठी व इंग्लिश अवांतर वाचनाची एकूण १४३२ पुस्तके आहेत.

हा समृद्ध ठेवा विद्यार्थी- विद्यार्थिनींसाठी सहज खुला व्हावा, नवनवीन पुस्तके त्यांच्या नजरेखालून जावीत, त्यांनी हाताळावी, वाचावी, यासाठी आपटे वसतिगृह आणि लजपत संकुलातील ग्रंथालयांच्या आधुनिकीकरण करण्यात आले आहे. या दोन्ही ग्रंथालयांची अंतर्गत रचना बदलून ती अधिक यूजर फ्रेंडली करण्यात आली आहे. अवांतर वाचन आणि क्रमिक पुस्तकांची वर्गवारी करून कपाटात लावण्यात आली आहेत. शिवाय तिन्ही ग्रंथालयांतील सर्व पुस्तकांच्या नोंदी संगणकावर एक्सेल शीटमध्ये करण्यात आल्याने विद्यार्थ्यांना हवे असलेले पुस्तक सहज मिळणे शक्य झाले आहे. पुस्तकांची देवाण- घेवाणही सुलभ झाली आहे. त्यामुळे साहजिकच गेल्या वर्षभरात विद्यार्थीवाचक तसेच ग्रंथालयाचा वापर करणाऱ्यांची संख्या वाढली आहे.



## पालकत्व

### सुंदर नात्याचा आनंद



विद्यार्थी सहायक समितीचे विश्वस्त तुकाराम गायकवाड यांचा आणि आमचा गेल्या ३०-३५ वर्षांपासूनचा स्नेह आहे. या संस्थेच्या पालकत्व या एका सुंदर नात्याची संकल्पना श्री. गायकवाड यांनी आम्हाला सांगितली आणि गेली जवळपास दहा वर्षे आम्ही या संकल्पनेशी व समितीशी निगडित आहोत.

गेल्या दोन वर्षांपासून पालकत्व योजनेच्या माध्यमातून श्रुती भोसले (द्वितीय वर्ष, बी.टेक. कॉम्प्युटर सायन्स) या अतिशय गुणी व सुसंस्कारित विद्यार्थिनीशी आमच्या कुटुंबाचा संबंध आला. एका अर्थाने आमच्या कुटुंबामध्ये श्रुतीच्या निमित्ताने एका नवीन सदस्यांची भर पडली. केवळ आम्ही दोघेच नव्हे, तर आमचा मुलगा, सून, मुलगी, नातू हे सर्व जण श्रुतीशी सातत्याने संपर्कात असतात, परस्परांशी संवाद ठेवतात.

जेंव्हा आम्ही दोघेच घरी असतो आणि श्रुतीची भेट ठरलेली असते तेव्हा आमच्या घरात गप्पांची मैफल रंगते. खूप मजा येते. श्रुती आमच्याकडील वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये उत्साहाने सहभागी होते.

समितीची मूल्याधिष्ठित शिस्त व त्याचा विद्यार्थ्यांच्या जडणघडणीवर होणारा सकारात्मक परिणाम जवळून बघताना खूपच आनंद होतो. समितीच्या पालकत्व योजनेमुळे एक सुंदर नाते निर्माण झाले आहे, त्याची व्याख्या कोणत्याही शब्दकोशात सापडणार नाही, त्यासाठी स्वतः पालकत्वाचा आनंद घेतला पाहिजे.

**- डॉ. श्रीधर व सौ. नलिनी राजपाठक**


## यशवंत



समितीच्या डॉ. आपटे वसतिगृहातील विद्यार्थिनी शिवांजली घाडगे हिने एआयएसएसएमएस या कॉलेजमधून इंजिनिअरिंगची पदवी प्राप्त केली. गुणवत्तेच्या आधारे तिला सुबोधन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमध्ये नोकरी मिळाली आहे. शिवांजली ही मूळची सोलापूर जिल्ह्यातील पोमाळवाडी येथील आहे.

# समिती हे हक्काचं, मायेचं घर

## शिंपल्यातील मोती



समिती सगळे काही देते. समिती म्हणजे माझ्यासाठी एक आधारवड आहे, जो समितीशी जोडले गेलेल्या प्रत्येकाला मायेची सावली देतो.

उच्च शिक्षणासाठी मी पुण्यात पाऊल ठेवल्यावर समितीनेच मला आधार दिला. समितीमध्ये वास्तव्य करूनच मी माझे पदवीचे शिक्षण पूर्ण केले. त्या काळात मी समितीच्या वातावरणात सुरक्षित होते. पदवीनंतर जसा माझा पाय समितीच्या बाहेर पडला, तेव्हा मला खरोखर जीवनातील संघर्षाची जाणीव झाली. एक एक अडचणी वाढत गेल्या. त्यात माझे आजारपण उद्भवले. या काळात समितीचे ततार सर आणि गारवेताई यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. मी आजारावर हळूहळू मात केली. दरम्यान, पदव्युत्तर शिक्षणासाठीचे प्रवेश पूर्ण झाले होते. त्यावेळी मराठवाडा मित्र मंडळाचे भाऊसाहेब जाधव यांनी मार्गदर्शन आणि मदत केली. एमएमसीसीमध्ये मला प्रवेश मिळाला. तेथून जर्नालिझम विषयात पदव्युत्तर पदवी घेतली. त्यानंतर नागपूरला जाऊन एकलव्य संस्थेबरोबर जोडले गेले. पण आणखी उच्च शिक्षणाचा ध्यास होता. त्यामुळे देशातील नामांकित विद्यापीठात प्रवेश घेण्याची तयारी सुरू केली. अझीम प्रेमजी विद्यापीठात डेव्हलपमेंट या विषयात पदव्युत्तर पदवीच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला. माझी गुणवत्ता पाहून या विद्यापीठाने माझा दोन वर्षांचा शैक्षणिक खर्च उचलला. सुमारे ८ लाख रुपयांपर्यंतची शिष्यवृत्ती दिली. माझ्या जिद्दीला यश मिळाले.

खेड्यापाड्यातील गरीब मुलांसाठी समिती हे मायेचं आणि हक्काचं घर आहे, जे त्यांना आधार देऊन उज्ज्वल भविष्यासाठी तयार करते. माझ्या या प्रवासात समितीचा मोलाचा वाटा आहे.

"वळून कोणी पाहिलं नाही म्हणून<br>
माळावरच्या चाफ्याचं अडलं नाही<br>
शेवटी पानांनीही साथ सोडली,<br>
पण पठ्ठ्यानं बहरणं सोडलं नाही"<br>
असंच समिती नावाचं आधारवड बहरत राहो, हीच इच्छा.

**- श्रेया इंगळे,** माजी विद्यार्थिनी

# पथनाट्याद्वारे मतदान जनजागृती




विद्यार्थी साहायक समितीतर्फे मुलामुलींनी मतदान जनजागृतीसाठी अतिशय कमी वेळात पथनाट्य तयार करून ते ठिकठिकाणी सादर केले.

लोकसभा निवडणुकीचे औचित्य साधून समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांनी पथनाट्याची कल्पना मांडली. विद्यार्थ्यांनी हे आव्हान स्वीकारत अवघ्या चार तासांत पथनाट्य बसविले. मुलींनीही त्यात सहभाग घेतला. त्या काळात परीक्षा सुरू होत्या. पण ज्या मुलांना दोन पेपरमध्ये मोठा कालावधी होता, अशा मुलांना या उपक्रमात सहभागी करून घेतले गेले. पर्यवेक्षिका मोनिका शिंदे, पर्यवेक्षक सचिन खांडेकर यांनी पुढाकार घेत आपटे वसतिगृहात पथनाट्याची प्रॅक्टिस करून घेतली. हे पथनाट्य अत्यंत शिस्तबद्ध रीतीने कमला नेहरू पार्क, गुडलक चौक-कलाकार कट्टा व संभाजी उद्यान येथे सादर करण्यात आले.

काही मुलींनी प्रथमच पथनाट्यात भाग घेतल्याने त्यांच्यातील सभाधीटपणा वाढल्याचे दिसून आले. पथनाट्य पाहणाऱ्या काही लोकांनी समितीबद्दल विचारणा केली. मुलांनी त्यांना समितीस भेट देण्याविषयी सांगितले. काही नागरिकांनी स्वतःहून मुलांबरोबर मतदानाची प्रतिज्ञा घेतली व फोटो काढण्यास सहभागी झाले.

सर्व पर्यवेक्षकांसह कार्यकर्ते नंदकुमार तळेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी उपस्थित होते. पथनाट्यात आपटे वसतिगृहामधील पूजा तावरे, अंकिता साकोरे, सिद्धी फदाले, अपर्णा ढमढेरे, पल्लवी मोतीपल्ले, गायत्री माने व लजपत संकुलामधील गौरव गोरे, विजय वाघ, आदिनाथ कदम यांनी सहभाग घेतला.





## डॉ. कणकवलीकर यांच्या शिष्यकुलाला भेट

'मी विजेता होणारच!' या कार्यक्रमाचे सादरकर्ते डॉ. उमेश कणकवलीकर एका कार्यक्रमानिमित्त विद्यार्थी साहाय्यक समितीमध्ये आले असताना, त्यांनी त्यांच्या शिष्यकुल संस्थेचा हजारो पुस्तकांचा संग्रह पाहण्यासाठी भेटीचे निमंत्रण समिती सदस्यांना दिले होते. त्यानुसार पर्यवेक्षिका मोनिका शिंदे व दोन विद्यार्थिनींनी १ मे रोजी डॉ. कणकवलीकर यांच्या शिष्यकुलाला (कर्डे, ता. शिरूर, जि. पुणे) भेट दिली.

शिष्यकुलात असंख्य पुस्तकांचा संग्रह तसेच वेगवेगळ्या चित्रपटांच्या सीडी आणि ऑडियो बुक्स आहेत. 'आम्ही तुमचे भविष्य घडवत नाही, आम्ही तुम्हालाच भविष्यासाठी घडवतो! हे आमचे ब्रीदवाक्य आहे, समिती हे 'युवा परिवर्तनाचे केंद्र' आहे. त्यामुळे समितीतील विद्यार्थ्यांशी संवाद साधायला आवडेल,' असे कणकवलीकर यांनी सांगितले. त्यांनी लिहिलेले 'विजेता होण्यासाठी - मी वाचन करणारच!' या पुस्तकाच्या प्रती त्यांनी समितीसाठी भेट दिल्या.

## मैत्री पुस्तकांशी

# 'रजनी ते रजिया' एक संघर्षगाथा

अमरावतीच्या रजिया सुलताना यांची ओळख बंडखोर लेखिका अशी आहे. 'रजनी ते रजिया' हे त्यांचे आत्मकथन आहे. यात अकरा प्रकरणे आहेत. आयुष्य प्रवासातल्या भल्याबुऱ्या घटना आणि अनुभव रजनीताईंनी या पुस्तकात शब्दबद्ध केले आहेत.

वयाच्या बावीसाव्या वर्षी त्या सरकारी शाळेत शिक्षिका म्हणून नोकरीला असताना प्रेमात पडल्या आणि त्यांनी लग्न केले. त्या हिंदू, तर पती मोबीन मुस्लिम. विरोधाला न जुमानता त्यांनी लग्न केले. रजनीच्या रजिया सुलताना झाल्या. पारंपारिक भारतीय स्त्री जशी पतीला परमेश्वर समजते, तसे त्यांना जमले नाही. पतीच्या भुवयांना आयुष्याचे होकायंत्र मानून प्रवास करणे म्हणजे स्वत्वाला मूठमाती देणे, हे त्यांना कळले, त्यातून सांसारिक संघर्ष तीव्र होत गेला. आपण निवडलेला मार्ग खाचखळग्याचा आहे, काटेरी आहे, याची त्यांना जाणीव झाली. मात्र तरीही ही वाट सोडायची नाही, असा निर्धारच त्यांनी केला होता.




लग्नानंतर पाच वर्षात त्यांना तीन मुले झाली. या मुलांच्या भवितव्यासाठी जीवाचा कोंडमारा होत असताना कधी विपथगामी मार्ग पत्करला नाही. प्रसंगी स्वतःवर मानसोपचार केले. स्वतःचा संघर्ष भयंकर असतानाही कैदी, किन्नर, देहव्यवसाय करणाऱ्या महिला, गे, लेस्बियन या समाज घटकांसाठी काम केले. या कामातून त्यांना स्वतःच्या दुःखावरचा उपचार सापडला. सोबतच ओळख मिळाली. असंख्य पुरस्काराने त्यांचा गौरव झाला.

पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणात लेखिकेने अमरावती जिल्ह्यातील आडगाव येथील बालपण आणि शिक्षणाविषयी लिहिले आहे. दुसऱ्या प्रकरणात डी.एड. प्रशिक्षण, शाळेची नोकरी, प्रेम व लग्न याबद्दल माहिती आहे. लग्नानंतर संसाराची गाडी हाकताना झालेल्या छळाची कहाणी आहे. एवढ्या प्रतिकूलतेतही त्यांनी कैद्यांसाठी काम केले. वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रियांसाठी त्यांनी केलेले कार्य पुस्तकात आले आहे. समस्याशी जोडून घेताना व्यक्ती म्हणून आलेले अनुभव त्यांनी लिहिले आहेत. तृतीयपंथीयांविषयीही एक प्रकरण आहे.

स्त्रियांच्या समस्यांसाठी लढणाऱ्या रजिया सुलताना पुस्तकात भेटतात. जातीधर्मांच्या विषम परंपरांवर त्या आघात करतात. स्त्रियाचे शोषण थांबावे, यासाठी समान नागरी कायद्याचे समर्थन करतात.

शब्दांची ताकद या प्रकरणात रजिया यांनी त्यांचा लेखन प्रवास विशद केला आहे. वर्तमानपत्रातील त्यांच्या एका लेखाने मुस्लिमांमधील काही लोक चवताळले. जिवे मारण्याच्या त्यांना धमक्या येऊ लागल्या. या काळात त्यांना भूमिगत होऊन दिवस काढावे लागले. मौलवींच्या दडपणाला बळी पडून पती तलाकसाठी रजिया यांच्याकडे येतो, तेव्हाचा प्रसंग वाचकांच्या डोळ्यात अश्रू आणतो.

पुढे सौदी अरेबियातील मक्का मदीना प्रवास, दुबई, थायलंड व बँकॉकचा प्रवास त्यांनी या पुस्तकात मांडला आहे. 'पाऊल पुढे टाकताना' या प्रकरणात रजिया यांनी आपले संकल्प लिहिले आहेत. हे आत्मकथन पारंपरिक पठडीतले नाही. त्यातली भाषा आणि संवाद थेट वाचकांच्या हृदयाला भिडतो.

**पुस्तकाचे नाव- रजनी ते रजिया**<br>
**लेखिका- रजिया सुलताना**

**- साक्षी विद्या दिनकर ताठे,**<br>
सुमित्रा सदन

# भविष्याचा वेध घेणारे पुस्तक

डिजिटल युगात आपले जीवन सुसह्य करण्याचे काम संगणक व इतर उपकरणे करीत आहेत. येत्या दहा वर्षांत स्मार्टफोन किंवा इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे संवाद साधणे अतिशय सुलभ होणार आहे. एकदा का आपण डिजिटल कौशल्यात पारंगत झालो की अनेक व्यवहार, व्यक्ती संबंधाचे पैलू आपण हाताळू शकू. "कर लो दुनिया मुठ्ठी में" हे स्वप्न आता सहज शक्य आहे. आजचे जग खूप चांगल्या प्रकारे जोडले गेले आहे. "वैश्विक खेडे" ही संकल्पना प्रत्यक्षात आल्याचे आपण पाहत आहोत. आज स्मार्टफोन चालते- फिरते संगणक झाले आहेत. त्यामुळे आपण अनेक गोष्टी सहजपणे कोठेही, कधीही आणि किफायतशीर दरात करू शकत आहोत. डॉ. दीपक शिकारपूर यांनी लिहिलेले डिजिटल चतुर व्हा हे पुस्तक तरुण विद्यार्थ्यांच्या दृष्टीने भविष्याचा वेध घेणारे आहे. व्यवसायात व करिअरमध्ये यशस्वी होऊ इच्छिणाऱ्यांना यशोशिखरावर नेण्याकरता "डिजिटल चतुर व्हा!" हे पुस्तक निश्चित योग्य मार्ग खुला करून देणारे ठरेल.




**पुस्तकाचे नाव-**<br>
**डिजिटल चतुर व्हा**<br>
**लेखक- डॉ. दीपक शिकारपूर**

**- गायत्री एकनाथ शेळके,**<br>
सुमित्रा सदन